# पुणे विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना

डॉ. पंडीत एन्. शेळके
एम्.एस्सी.,पीएच्.डी.
प्र. कार्यक्रम समन्वयक

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७.

कार्यालय क्र. : ०२०-२५६९७३४१
०२०-२५६०११५३
०२०-२५६०११६०
फॅक्स क्र. : ०२०-२५६९७३४१


रासेयो/११३८/२०१४ दि. ०५/०२/२०१४

**प्रती,**
**मा. प्राचार्य/कार्यक्रम अधिकारी**
**पुणे, अ.नगर, नाशिक**
**रासेयो संलग्नीत महाविद्यालये**

**विषय : राष्ट्रीय सेवा योजना राज्यस्तरीय शिबीरासाठी 5 विद्यार्थी व 5 विद्यार्थिनी पाठविणेबाबत...**

महोदय,

पुणे विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना व पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे प्रा. रामकृष्ण मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आकुर्डी पुणे 44 यांच्या संयुक्त विद्यमाने दि. 22 ते 28 फेब्रुवारी 2014 या कालावधीत राज्य स्तरीय शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबीरामध्ये जल संवर्धन व वन संवर्धनाच्या दृष्टीने विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण व्हावी या हेतूने विविध व्याख्याने, मार्गदर्शन व प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात येणार आहे. जल संवर्धन व वन संवर्धनाच्या क्षेत्रात काम करणा–या संस्थांचे प्रतिनिधी या ठिकाणी मार्गदर्शन करणार आहेत. तरी आपल्या महाविद्यालयातील 5 विद्यार्थी व 5 विद्यार्थिनी या शिबीरासाठी पाठविण्यात यावेत.

सदर शिबीर प्रा. रामकृष्ण मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, से. नं. 27, गंगानगर, प्राधिकरण या ठिकाणी आयोजित करण्यात आलेले आहे. शिबीरामध्ये सहभागी होणा–या स्वयंसेवकांनी महाविद्यालयाच्या ठिकाणी दि. 22 फेब्रुवारी रोजी दुपारी 1.00 वा. उपस्थित राहणे अनिवार्य आहे. **स्वयंसेवकांनी येताना आपल्या महाविद्यालयाचे प्राचार्यांच्या सहीचे पत्र, स्वतःचे ओळखपत्र आणणे गरजेचे आहे. तसेच सात दिवसांसाठी अंथरूण, पांघरूण, कपडे, बूट, जेवणासाठी ताट वाटी, फुलपात्र आणणे आवश्यक आहे.** विद्यार्थ्यांच्या प्रवासाचा खर्च महाविद्यालयाने त्यांच्या नियमित कार्यक्रमाच्या खर्चामधून करावयाचा आहे. शिबीर स्थळी येण्याचा मार्ग

1. स्वारगेट – निगडी बस क्र. 12, 42 या बसने आकुर्डी येथे उतरावे.
2. पुणे मनपा, पुणे स्टेशन – निगडी या बसने आकुर्डी येथे उतरावे
3. पुणे स्टेशन – आकुर्डी रेल्वे स्टेशन (लोकल) – निगडी बसने गंगानगर येथे उतरावे.

संपर्क– डॉ. सविता कुलकर्णी 9923426774 , प्रा. सुधिर बोराटे (कार्यक्रम अधिकारी) 8149371256

तरी आपल्या महाविद्यालयातील 5 विद्यार्थी व 5 विद्यार्थिनी यांना सदर शिबीरास पाठवून सहकार्य करावे ही विनंती. **कळावे,**

आपला विश्वासू

**प्र. कार्यक्रम समन्वयक**
**राष्ट्रीय सेवा योजना**

Pc2/Tin Job/Daily Lette1